**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**सार्वजनिक आरोग्य खाते**

**क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी-15.**

**काआअ/4004/क्षरुस(वआ) दि. 07.02.2023.**

# <u>जाहिरात</u>

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत क्षयरोग रुग्णालय समूहाच्या आस्थापनेवरील खालील नमूद 'प्रतितास तत्वावर विशेषज्ञ डॉक्टर' पदे कंत्राटी तत्वावर भरण्याकरिता खालील नमूद अर्हता धारण केलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**1) विशेषज्ञ डॉक्टर-** हृदयरोग **(Cardiology)**
<u>शैक्षणिक अर्हता-</u> उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाची **हृदयरोग** शास्त्रामध्ये पदव्युत्तर पदवी (**DM/DNB Cardiology**)/फेलोशिप प्राप्त केलेला असणे आवश्यक आहे.

**2) विशेषज्ञ डॉक्टर-** मज्जासंस्था **(Neurology)**
<u>शैक्षणिक अर्हता-</u> उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाची मज्जासंस्था शास्त्रामध्ये पदव्युत्तर पदवी **(DM/DNB Neurology)**/फेलोशिप प्राप्त केलेला असणे आवश्यक आहे.

**3) विशेषज्ञ डॉक्टर-** त्वचारोग **(Dermatology)**
<u>शैक्षणिक अर्हता-</u> उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाची त्वचारोग शास्त्रातील **MD Dermatology** डीग्री, **Diploma in Skin & Venereal Diseases** किंवा फेलोशिप प्राप्त केलेला असणे आवश्यक आहे.

**सर्वसाधारण अटि व शर्ती –**

1. विशेषज्ञ डॉक्टर्सना ठरवून दिलेल्या दिवशी व वेळेवर क्षयरोग रुग्णालयात भेट(Visit)देण्यास यावे लागेल.
2. सदरील दिवशी OPD Holiday असेल तर त्याच्या आगोदरच्या किंवा नंतरच्या दिवशी भेट (Visit) दयावी लागेल.
3. रुग्ण जर अतिशय अशक्त असेल तर आंतररुग्ण विभागात जाऊन भेट (Visit) दयावी लागेल.
4. क्वचित वेळी गरज असल्यास एखाद्या रुग्णाला दिलेल्या उपचाराबद्दल इलाज करणा-या वैद्यकीय अधिकारी यांना काही शंका असतील तर दुरध्वनीवर उपलब्ध व्हावे लागेल.

5. .‘प्रतितास तत्वावर विशेषज्ञ डॉक्टर’ पदावरिल नियुक्ती भविष्यात कोणत्याही परिस्थितीमध्ये नियमित करण्यात येणार नाही.
6. ‘प्रतितास तत्वावर विशेषज्ञ डॉक्टर’ पदावरिल नियुक्ती आवश्यकता नसल्यास कुठल्याही क्षणी संपुष्टात आणण्यात येईल.
7. ‘प्रतितास तत्वावर विशेषज्ञ डॉक्टर’ पदावरिल नियुक्ती ही नियमित तत्वावरिल नियुक्तीकरिता ग्राहय धरण्यात येणार नाही.
8. ‘प्रतितास तत्वावर विशेषज्ञ डॉक्टर’ पदावरिल नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी पदधारकाने चुकीची माहीती प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याने किंवा कोणतीही माहीती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.
9. ‘प्रतितास तत्वावर विशेषज्ञ डॉक्टर’ पदावरिल नियुक्तीच्या वेळी 200 रुपयांच्या बॉन्ड पेपरावर विहित नमुन्यातील कंत्राट करार करुन संबंधीत आस्थापनेस 07 दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक राहील अन्यथा त्याची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.
10. पदधारकाने नियुक्ती कालावधीत शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
11. पदधारकास कुठल्याही कारणास्तव पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास त्याने एक महिना आधी पुर्वसूचना देणे बंधनकारक आहे.
12. ‘प्रतितास तत्वावर विशेषज्ञ डॉक्टर’ (Hourly Speciality Consultants) क्षयरोग रुग्णालय प्रमूखांच्या अधिपत्याखाली कर्तव्यार्थ राहतील.
13. पदवीधारक विहीत अटि पूर्ण करित नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती त्वरित रद्द करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.
14. ‘प्रतितास तत्वावर विशेषज्ञ डॉक्टर’ या पदाचे आदेश प्राप्त झाल्यावर सात दिवसाच्या आत त्वरित कर्तव्यार्थ हजर राहावे लागेल अन्यथा सदर पदाच्या नियुक्तीकरिता आपणास स्वारस्य नसल्याचे समजून पुढिल उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.
15. भेट (Visit) साठी Travelling Allowance दिला जाणार नाही.
16. मानधन महिन्याच्या अखेरीस दिले जाईल.

**<u>कर्तव्ये व जबाबदा-या</u>-**

1) रुग्णाना 24x7 सेवा देणे, बाहयरुग्ण सेवा व आंतररुग्ण सेवा व अतिदक्षता सेवा, शस्त्रक्रीया सेवा इत्यादी रुग्णांशी निगडीत सेवा पूरविणे.

2) क्षयरोग रुग्णालयातील उपलब्ध असलेल्या सेवांच्या क्षमतेचा पूर्णतः वापर करणे.

3) सर्व निवासी, कंत्राटी तसेच निम्नवैदयकीय कर्मचारी वर्गाला क्षयरुग्णांच्या उपचारासंबंधीचे योग्य मार्गदर्शन करणे तसेच त्यांच्या कामाचे पर्यवेक्षण करणे.

4) रुग्णालयीन कामकाजाचा आढावा व पुनर्विलोकन करण्यास प्रशासनास सहाय्य करणे.

5) वरिष्ठ पातळीवरुन वेळोवेळी नेमुन दिलेल्या जबाबदा-या पार पाडणे, वैदयकीय अधिक्षक व खातेप्रमुख यांना वेळोवेळी अहवाल सादर करणे.

हृदयरोग विभागाची अधिक गरज भासत असल्याने त्यांना आठवड्यातून तीन वेळा बोलाविण्यात येईल व मज्जासंस्था व त्वचारोग यांना आठवड्यातून एक वेळा बोलविण्यात येईल. विशेषज्ञ डॉक्टर पुर्णवेळ उपलब्ध होत नसल्याने त्यांना प्रतितास तत्वावर मानधन देण्यात येईल.

त्वचारोग विभागाच्या विशेषज्ञ डॉक्टरांना एका दिवशी 2 तासांच्या प्रत्येक भेटीसाठी (Per Visit) रु.2000/- वेतन देण्यात येईल. तसेच हृदयरोग व मज्जासंस्था विभाग हे सुपर स्पेशालिटी असल्यामुळे त्यांना 2 तसांच्या प्रत्येक भेटीसाठी (Per Visit) रु.3500/- वेतन देण्यात येईल.

| अ.क्र | विशेषज्ञ विभाग | दर साप्ताहिक भेटीची संख्या | प्रत्येक दोन तास भेटीसाठी मानधन | अंदाजे वार्षिक मानधन (52 आठवडे) |
|---|---|---|---|---|
| 1. | हृदयरोग | 03 | 3,500/- | 5,46,000/- |
| 2. | मज्जासंस्था | 01 | 3,500/- | 1,82,000/- |
| 3. | त्वचारोग | 01 | 2,000/- | 1,04,000/- |

वैद्यकीय अधिक्षक क्षयरोग रुग्णालय समूह यांचे कार्यालयात जाहिरात प्रसारित झाल्यापासून (दि.20.02.2023 ते 06.03.2023 ) आलेले अर्ज प्रचलित निवड प्रक्रियेनुसार निवडण्यात येतील.

s/d s/d s/d

**वैद्यकीय अधिक्षक क्षयरोग रुग्णालय समूह** **संयुक्त कार्यकारी आरोग्य अधिकारी (विशेष रुग्णालये)** **कार्यकारी आरोग्य अधिकारी**